अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. २९ ऑगस्ट २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३२९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## महिलेच्या गळ्यातील चेन पळवली

**वेळापूर :** तूप घेण्याचा बहाणा करून दुचाकी वरून आलेल्या चोरट्याने महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन हिसका मारून तोडून नेली. ही चोरीची घटना वेळापूर येथील पालखी चौकात मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. या संदर्भात सुनंदा भारत दोशी (रा. पालखी चौक, वेळापूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या मंगळवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास आपल्या महावीर किराणा दुकानात काम करीत होत्या. त्यावेळी दुचाकिवरून आलेल्या दोघांनी त्यांना तुप मागण्याचा बहाणा केला. आणि त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम सोन्याची चैन हिसका मारून तोडून दुचाकिवरून पसार झाले. अशी नोंद पोलिसात झाली आहे.

## चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ

**सोलापूर :** चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ आणि मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना हनुमान नगर, भवानी पेठ येथे घडली. याप्रकरणी अक्षता अविनाश भोसले (वय-२२,रा. हनुमान नगर) यांनी फिर्याद दिली आहे. पती अविनाश भोसले, सासरे गोपाळ भोसले व दिर विकास भोसले (सर्व रा.महाळुंग, माळशिरस) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. अविनाश हा दारू पिऊन येऊन पत्नीवर संशय घेऊन शिवीगाळ करत होता. सासरे व दिरानेही अक्षताला मारहाण केली. आहे. तपास पो.हे.कॉ. पैकेकरी हे करीत आहे.

# आधी किडनॅप केले, जंगलात नेले लोखंडी पाईपने डोके फोडून काढले

**सांगोला/प्रतिनिधी**

**घरातील एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून एका इसमाने नात्यातीलच एका व्यक्तीचा खून केल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. गजेंद्र विश्वनाथ शिंदे (वय ५५) असे खून झालेल्या इसमाचे नाव आहे. सागर किसन इंगोले रा.खिलारवाडी याच्याविरूद्ध फिर्याद देण्यात आली असून सांगोला पोलिसांनी अवघ्या बारा तासात पंढरपूरजवळ इंगोलेच्या मुसक्या आवळून त्याला ताब्यात घेतले. सागरने अगोदर गजेंद्रचे अपहरण केले.कारमध्ये जबरदस्तीने बसवून त्याला याच तालुक्यातील शिरभावी फॉरेस्टजवळ नेऊन लोखंडी पाईपने डोक्यात घाव घातले. त्यात गंभीर जखमी होवून गजेंद्र हा मरण पावला**



मयत गजेंद्र शिंदे

- **सांगोला तालुक्यातील शिरभावी फॉरेस्टमधील थरार**
- **अनैतिक संबंधाचा संशय; खिलावरवाडीच्या इसमाचा खून**
- **पोलिसांनी बारा तासात आरोपीच्या मुसक्या आवळल्या**



सांगोला : येथील शिरभावी गावातील घटनास्थळीची पाहणी करताना पोलीस अधिकारी व कर्मचारी.

सांगोला पोलीस ठाण्याकडून मिळालेली माहिती अशी की, गर्जेंद्रचा खून केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास शिरभावी हद्दीतील फॉरेस्टमध्ये घडली. ही घटना बुधवारी उघडकीस आली. गर्जेंद्र आणि संशयीत आरोपी सागर हे दोघेही नातेवाईक आहेत. दोघेही खिलारवाडी गावचे रहिवासी आहेत. आरोपी सागर हा घरातील एका महिलेचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयाने पछाडलेला होता. मंगळवारी पाचच्या सुमारास सागरने घरातून गर्जेंद्रला उचलले आणि शिवीगाळ करून कारमध्ये जबरदस्तीने बसवले. गादेगाव, वाखरी, कराड रोड या भागात गाडी फिरवली. गादेगावमधील एका पान टपरीवाल्याकडून लोखंडी पाईप घेतला. पुढे शिरभावी गावातील फॉरेस्टमध्ये सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्याला आणले. त्या ठिकाणी गर्जेंद्रच्या डोक्यात त्या लोखंडी पाईपने प्रहार घातले. डोक्यात वर्मी घाव बसल्याने रक्तबंबाळ होवून तो जागेवरच गतप्राण झाला. एक पत्यक्षदर्शी व्यक्तीपुढेच सागरने गर्जेंद्रचा खून केला. प्रत्यक्षदर्शी व अन्य एका व्यक्तीला शिरभावी फॉरेस्टमध्ये कॅनॉलच्या पट्टीवर निर्जन स्थळी सोडून गर्जेंद्रने घटनास्थळाहून पसार झाला. मृत गर्जेंद्र शिंदे यांचा मुलगा सौरभ शिंदे (वय २७) याने सांगोला पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे. पुढील तपास सपोनी पवन मोरे हे करीत आहे. सागर इंगोले हा फिर्यादी सौरभ शिंदे याचा मामेभाऊ असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. इंगोले आणि शिंदे फॅमिली खिलारवाडी या एकाच गावात राहातात. तपासातून बऱ्याच गोष्टींचा उलगडा होण्याची शक्यता आहे. आरोपी सागरला आज गुरूवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## राष्ट्रविरोधी पोस्ट टाकणाऱ्यांना होणार जन्मठेप

**लखनऊ :** सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्यांविरूद्ध उत्तर प्रदेशच्या सरकारने कडक पाऊल उचलले आहे. त्यानुसार राष्ट्रविरोधी पोस्ट लिहिणाऱ्या सोशल मीडियावरील युजर्सवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. अशा पोस्ट टाकणाऱ्या युजर्सना आता जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. तसेच सरकारच्या योजनांचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या इन्फ्लूएन्सरना लाखो रुपये मिळू शकतात, अशीही तरतूद या धोरणाद्वारे करण्यात आली आहे.

उत्तर प्रदेश सरकारने ''उत्तर प्रदेश डिजिटिल मीडिया पॉलिसी, २०२४'' जाहिर केली आहे. या धोरणाद्वारे आक्षेपार्ह पोस्टसाठी तीन वर्ष ते जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच जर एजन्सी किंवा एखाद्या कंपनीद्वारे चुकीच्या पोस्ट अपलोड केलेल्या असतील तर त्याविरोधातही कारवाई करण्यात येणार आहे. नवीन धोरणानुसार सोशल मीडिया इन्फ्लूएन्सरना त्यांचे फॉलोअर्स आणि सबस्क्राइबर्स पाहून सरकारी योजनांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम दिले जाणार आहे. अशा इन्फ्लूएन्सरना प्रति महिना आठ लाखापर्यंतचे पॅकेज दिले जाऊ शकते, अशी माहिती मिळत आहे.

## अकलूजच्या पोलीस हवालदाराची गळफास घेऊन आत्महत्या

**अकलूज :** पोलीस ठाणे अकलूज ता. माळशिरस येथे कार्यरत असणारे पोलीस हवालदार सोमनाथ हरीभाऊ कोळी यांनी पोलीस वसाहत, अकलूज येथील राहत्या घरी गळफास आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.



याबाबत पोलीसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की,मयत पोलीस हवालदार सोमनाथ कोळी यांचे मुळ गाव पंढरपूर होते. ते पत्नी व दोन मुलासह अकलुज येथील पोलीस कॉलनीमध्ये राहत होते. बुधवारी, दि.२८ ऑगस्ट २०२४ रोजी दु.१.३० ते २.३० वा. चे दरम्यान पोलीस हवालदार कोळी यांनी राहते घरातील बेडरुममधील छताचे पंख्याला साडीने गळफास घेतल्याचे त्यांच्या पत्नीला आढळून आले. कोळी यांना तात्काळ त्यांची पत्नी व बाजुस राहणारे पोलीस अंमलदार हे वाहनातुन अकलाई आय.सी.यु. सेंटर अकलूज येथे उपचारासाठी घेवुन गेले. तेथील डॉक्टरांनी तपासले असता ते मयत झाले असलेचे सांगितले. त्यांचे पश्चात त्यांच्या कुटुंबात पत्नी, दोन मुले, आई, भाऊ, भावजय असा परिवार आहे. गळफास घेण्याचे कारण अदयाप स्पष्ट झाले नसल्याचे सांगण्यात आले आहे.

## शेअर गुंतवणुकीत २२ लाखांची फसवणूक

**टेंभुर्णी :** वित्तीय संस्थेच्या शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास दरमहा ५० टक्के परतावा देतो असे सांगून १४ लोकांना २२ लाख ५० हजार रुपयाची फसवणूक केल्याची घटना टेंभुर्णी (ता.माढा) येथील हॉटेल धनश्री येथे घडल्याचे नुकतेच उघडकिस आले आहे .या प्रकरणात टेंभुर्णीच्या पोलिसांनी वी.आर मूर्ती (रा. नवी दिल्ली) मिंडा श्रीनिवासराव (रा. सिकंदराबाद) बलविंदर सिंग, अमन प्रीत (दोघे रा.नोएडा) आणि पायल वर्मा मॅडम अशा ५ जणाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात सूरज दीपक शिंदे (रा. निमगाव, ता.टेंभुर्णी) या तरुणाने पोलिसात फिर्याद दाखल केली. व्ही.आर . मूर्ती आणि मेंढा श्रीनिवास राव या दोघांनी ६ जानेवारी ते २१ एप्रिल २०२४ या कालावधीत टेंभुर्णी येथील हॉटेल धनश्री येथे बैठक घेतली होती.

अन्य तिघांनी ओळख करून दिली. त्यांच्या श्रीममा फॉर्म ॲनिमल बजार प्रा.लि. आणि बालाजी मीडिया फिल्म या नावाच्या वित्तीय संस्था आहेत शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करणाऱ्यांना दरमहा ५० टक्के परतावा देतो असे सांगून १४ लोकांकडून प्रत्येकी दीड लाख रुपये घेतले होते. अद्याप फायदा आणि मुद्दल दिली नाही, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.



दिल्ली : दिल्ल येथे विमानसेवे संदर्भात आयोजित बैठकीत ना. राममोहन नायडू, ना. मुरलीधर मोहोळ, आ. सचिन कल्याणशेट्टी व इतर अधिकारी.

## सोलापुरात विमानसेवा सुरू करण्यासाठी दिल्लीत बैठक

**सोलापूर/प्रतिनिधी**

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा पुढाकार

#### ऑक्टोबरमध्ये विमान सेवा करण्याचा प्रयत्न

सोलापूर-मुंबई, सोलापूर-तिरुपती, सोलापूर-दिल्ली, सोलापूर-हैदराबाद येथे विमानसेवा सुरू करण्याबाबत विविध विमान कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा झाली. येत्या ऑक्टोंबरमध्ये विमान सेवा करण्याचा प्रयत्न असल्याचे कल्याणशेट्टी म्हणाले.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयात बुधवारी महाराष्ट्रातील सोलापूर येथील विमानतळ संदर्भातील समस्यांचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय बैठक केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाली.

केंद्र सरकारने उडान-आरसीएसच्या माध्यमातून सोलापूर विमानतळावर ५० कोटी रुपये खर्च करून विविध विकासकामे केली आहेत. विमानतळावर आवश्यक मनुष्यबळांना प्रशिक्षण देणे सुरू असून लवकरच हे दल सेवेत दाखल होणार आहे. डीजीसीए लायसन्सची प्रक्रिया आणि इतर तांत्रिक गोष्टी लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना ना. नायडू यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीत विमानतळ प्राधिकरणाचे अध्यक्ष एम सुरेश, नियोजन आणि संचालन मंडळाचे सदस्य डॉ. शरद कुमार तथा आकासा, इंडिगो आदी विमान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवले

**सोलापूर :** मामाच्या गावात मामाच्या घरा भोवती राहावयास असलेल्या अल्पवयीन भाचीला अज्ञात इसमाने फूस लावून पळून नेले. रवींद्र जाधव हे रिक्षा चालक आहेत.त्यांची भाची ही अल्पवयीन असून,ती आठवी शिकते. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसात वाचण्याच्या सुमारास ती घरातून बेपत्ता झाली. मामा तसेच आजी सर्वांनी तिचा नातेवाईकाकडे तसेच रेल्वे स्टेशन,एसटी बस स्थानक या ठिकाणी शोध घेतला. परंतु ती आढळून आली नाही.त्यामुळे अज्ञात व्यक्तीने तिला फुस लावून पळवुन नेल्याची फिर्याद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. तपास पोलीस नाईक मुलाणी हे करत आहेत.

## मोहोळ येथे कंडक्टरला चापटाने मारहाण; दोघांवर गुन्हा

**मोहोळ :** प्रवाशाचे सामान खाली उतरवल्याचा राग धरून एसटीच्या कंडक्टरला चापटाने मारहाणकरून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा प्रकार मोहोळ बसस्थानकात सोमवारी रात्री घडला. मोहोळच्या पोलिसांनी दोघा अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात विकी निवृत्ती गायकवाड (वय ३७ रा . कवठाळी ता. उत्तर सोलापूर) या कंडक्टरने मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली . ते सोमवारी रात्री सोलापूर ते ठाणे ही बस घेऊन निघाले होते. मोहोळ स्थानकात बस थांबली. त्यावेळी एका प्रवाशाने मोठी गोणी घेऊन बसमध्ये प्रवेश केला. त्यावेळी कंडक्टरने त्यांना ही गोणी पाठीमागच्या सीट जवळ ठेवा, तेथे जागा मोकळी आहे असे सांगितले. तेंव्हा तो प्रवासी गोणी घेऊन खाली उतरला होता. त्यावेळी दोघांनी बस तुझ्या बापाची आहे का ? म्हणून कंडक्टला मारहाण केली. स.निरीक्षक लातूरकर तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




यांनाच यांचे सापडेना!

कल्याण
669-16-268

मुंबई
556-60-389

# विठ्ठल कारखान्याला २६७ कोटींचे कर्ज मंजूर

**सोलापूर/प्रतिनिधी**

**राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून राज्यातील सोळा साखर कारखान्यांना मर्जिन लोन उपलब्ध करून देण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. त्यातील पाच कारखान्यांसाठी ५९४.७६ कोटी रुपये इतका निधी राज्य सरकारला उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये सर्वाधिक २६७ कोटी रुपये कर्ज पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला कर्ज मंजूर झाले आहेत. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विठ्ठल सहकारी कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांच्यासाठी हा मोठा बोनस मानला जात आहे.**






उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर १०७. ६९ कोटी रुपये राखून ठेवल्यानंतर उर्वरित ४८७ कोटी रुपये राज्यातील पाच सहकारी साखर कारखान्यांना मंजूर करण्यात आले आहेत. तो निधी राज्यातील पाच सहकारी कारखान्यांना मंजूर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीच्या २३ जुलै रोजीच्या बैठकीत घेण्यात आला होता.

पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखान्याने मर्जिन लोन संदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेनुसार उच्च न्यायालयाने १०७. ६९ कोटी रुपये १९ सप्टेंबरपर्यंत राखीव ठेवण्याचे आदेश दिले होते, त्यानुसार ही रक्कम राखीव ठेवून उर्वरित रक्कम राज्यातील पाच साखर कारखान्यांना वितरित करण्यात आली आहे. पाच साखर कारखान्यांपैकी सर्वाधिक २६७ कोटी ६९ लाखांचे कर्ज पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास मंजूर केली आहे, त्यातील प्रत्यक्ष २१९.५४ कोटी रुपयांची रक्कम विठ्ठल कारखान्याला मिळणार आहे. माढ्यातून विधानसभा निवडणूक लढविण्याची घोषणा अभिजीत पाटील यांनी केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विठ्ठल कारखान्याला मिळालेले हे कर्ज अभिजीत पाटील यांना बोनस ठरण्याची शक्यता आहे.

## अभिजीत पाटलांना निवडणुकीपूर्वीच बोनस

### या कारखान्यांनाही मिळणार कर्ज

सांगली जिल्ह्याच्या वाळवा तालुक्यातील पद्मविभूषण क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर कारखान्याला १४८.९० कोटी, नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील अशोक सहकारी साखर कारखान्याला ९०.३० कोटी, सांगली जिल्ह्यातील चिखली येथील विश्वासराव नाईक सहकारी कारखान्याला ६५ कोटी, किल्लारी तालुका औसा येथील शेतकरी सहकारी कारखान्याला २२.९७ कोटी रुपयांची रक्कम मिळणार आहे.

### फडणवीसांनी पाटलांना दिला होता शब्द

अभिजीत पाटील यांनी लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांची साथ सोडत भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. त्याचवेळी विठ्ठल कारखान्याला मदत करण्याचा शब्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. त्यानुसार विठ्ठल कारखान्याला सर्वाधिक २६७ कोटी ६९ लाखांचे कर्ज मिळाले. त्यामुळे फडणवीसांनी दिलेला शब्द खरा करून दाखवला आहे.